दै.बीड
www.beedsuperfast.com
# सुपरफास्ट
संपादक : अतुल शंकरराव जाधव

बीड (महाराष्ट्र) | वर्ष ३ | अंक २७९ | रविवार दि. १२ ऑक्टोबर, २०२५ | RNI : MAHMAR/2023/84694 | पाने ४ | किंमत ४ रु.
BEED (Maharashtra) | Year-3 | Issue-279 | Sunday 12 October, 2025 | RNI : MAHMAR/2023/84694 | Pages 4 | Price 4

## एक कोटींच्या विमा धनादेशाचे पोलिस अधीक्षकांकडून वितरण

**बीड । प्रतिनिधी**
जिल्हा पोलिस दलात कर्तव्यावर असलेल्या सुनील सुंदरराव घोळवे व सुभाष अजिनाथ तेलप या दोघांचा अपघाती मृत्यू झाला. दोन्ही पोलिस हवालदार घरातील कर्ते होते.स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये दोघांचाही विमा असल्याने या दोघांना प्रत्येकी १ कोटींचा विमा मंजूर करण्यात आला.



पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या हस्ते व बँकेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या धनादेशाचे वितरण करण्यात आले. सुनील सुंदरराव घोळवे यांचे ९ नोव्हेंबर २०२४ रोजी तर सुभाष अजिनाथ तेलप यांचे २४ नोव्हेंबर २०२४ रोजी अपघाती निधन झाले.

# प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार - आ.संदीप क्षीरसागर

## बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष आणि सर्व जागेवर नगरसेवक निवडून आणणार - आ.संदीप क्षीरसागर

## पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त केला विश्वास

### बैठकीला हजारो पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**
बीड नगर पालिकेच्या निवडणुकीत आपलाच उमेदवार नगराध्यक्ष म्हणून निवडून येणार असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त केला. आगामी बीड नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि.११ (शनिवार) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) च्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व कार्यकर्त्यांची आणि पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला मोठी गर्दी पाहावयास मिळाली. हजारोच्या संख्येने कार्यकर्ते,



**कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटता कामा नये –आ.संदीप क्षीरसागर**
**शहरातील कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटली नाही पाहिजे. साखळी जर तुटली नाही तर नगर पालिका आपल्याच ताब्यात येणार. जर का कोणी उमेदवार साखळी तोडून गेला तर लोकांना तो माझा उमेदवार नाही असे सांगेल. साखळी तोडणाऱ्याला निवडणुकीत धडा शिकवण्यासाठी जनताच पुढाकार घेईल असा इशारा देखील आ.संदीप क्षीरसागरांनी बैठकीत दिला.**

पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवार उपस्थित होते. या बैठकीत आ. संदीप क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना नगर परिषद निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना म्हणाले की,अतिवृष्टीच्या पावसामुळे अनेक ग्रामीण भागात नुकसान झाल्यामुळे नगर पालिकेची निवडणूक अगोदर होणार आहे. येणाऱ्या निवडणुकीत विरोधक जातीचे राजकारण करतील. त्यांना न जुमानता जोमाने » पान २ वर



# टोकेवाडी येथे जलसमाधी आंदोलन

### सकाळपासून आंदोलक पाण्यात ठाण मांडून; पोटात पाणी गेल्याने दोघांना दवाखान्यात हलविले

**केज । प्रतिनिधी**
शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार आणि कोरडेवाडी येथील तलाव मंजूर करण्यात यावा, ज्ञानराधा मल्टीस्टेट मधील ठेवी परत मिळाव्यात या मागणीसाठी सुरू असलेल्या राजश्री उमरे- पाटील यांच्या उपोषणाचा आज नववा दिवस आहे. मात्र, त्यांच्या उपोषणाची प्रशासनाने दखल घेतली नसल्याच्या निषेधार्थ आज शनिवारी (दि. ११) धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी आणि ग्रामस्थांनी टोकेवाडी येथील तलावात उतरून जलसमाधी आंदोलन सुरू केले आहे. सकाळपासून आंदोलक पाण्यात ठाण मांडून आहेत. दोघा आंदोलकाला दवाखान्यात हलविण्यात आले आहे. दरम्यान, पाण्यात उतरलेल्या आंदोलकाच्या पोटात पाणी गेल्यामुळे दोघांना अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले आहे. तर काही आंदोलक हे झाडावर चढले आहेत. त्यामुळे पोलीस आणि महसूल प्रशासनाची दमछाक होत आहे. जो पर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तो पर्यंत पाण्याबाहेर न येण्याचा निर्धार आंदोलकांनी केला आहे. दरम्यान, प्रशासनाच्या वतीने नायब तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी स्वतः तलावात उतरून आंदोलकांशी चर्चा केली. आठ दिवसांपासून धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या वतीने कोरडेवाडी येथे राजश्री उमरे- पाटील यांनी अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ५० हजार नुकसान भरपाई देण्यात यावी. ज्ञानाराधा मधील ठेवीदारांच्या ठेवी परत देण्यात याव्यात आणि कोरडेवाडीच्या नियोजित साठवण तलावाला पाणी उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे. या प्रमुख मागण्यांसह इत्तर मागण्यांसाठी उपोषण सुरू केले आहे. उपोषणाला आठ दिवस उलटून गेले तरी प्रशासनाने त्यांची दखल घेतलेली नाही. यामुळे संतप्त ग्रामस्थांनी हा पवित्रा घेत त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून पाण्यात उतरुन जलसमाधी आणि झाडावर चढून आंदोलन सुरू केले आहे.

## सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांनी स्वीकारला केज उपविभागाचा पदभार

**बीड । प्रतिनिधी**
महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार त्रिपुरा संवर्गातून महाराष्ट्र संवर्गात बदली झालेल्या वेंकटराम (भा.पो.से.) यांनी आज दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी सहाय्यक पोलीस अधीक्षक, केज या पदाचा पदभार स्वीकारला आहे.दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार वेंकटराम यांची नियुक्ती केज उपविभागासाठी करण्यात आली होती. याआधी सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांची २१ जुलै २०२५ रोजी बदली झाल्यानंतर हे पद रिक्त होते. त्या कालावधीत केज उपविभागाचा अतिरिक्त पदभार सहाय्यक पोलीस अधीक्षक (अंबाजोगाई) श्री. हर्षिकेश शिंदे (भा.पो.से.) यांच्याकडे होता. वेंकटराम यांनी आज केज येथे हजर होऊन अधिकृतपणे सहाय्यक पोलीस अधीक्षक पदाचा कार्यभार स्वीकारल्याने केज उपविभागास कायमस्वरूपी अधिकारी मिळाला आहे.



## लाच मागणी करून स्वीकारल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**बीड । प्रतिनिधी**
ससेवाडी, पो. मांजरसुंबा, ता. बीड येथील तक्रारदार याने दि.२४-०९-२०१४ पोलीस उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तक्रार दिली की, तक्रारदार हे जुलै २०१४ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. तक्रारदार याचे सेवानिवृत्ती नंतर मिळणारे भविष्य निर्वाह निधी व इतर बीले तयार करून वरीष्ठाकडे सादर करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड येथील आस्थापना शाखेतील कनिष्ठ लिपीक दादासाहेब मोरे यांनी तक्रारदारास रु.३,०००/- लाचेची मागणी केली व लाच रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडले होते. त्यावरून पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड यांनी तांत्रिक बाबीची पुर्तता करून आरोपी विरूद्ध लाच लुचपत प्रतिबंधक कायद्याचे कलम ७, १३ (१) (ड) सह कलम १३ (२) अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात पाठवले होते. सदर प्रकरण हे मा. स्पेशल जज्ज, बीड यांचे समोर वर्ग झाले होते. त्यात सुनावणी होऊन फिर्यादी पक्षाच्या वतीने साक्षदार तपासले होते. प्रकरणात आरोपीच्या वकीलांचा युक्तीवाद व बचाव लक्षात घेऊन मा. स्पेशल जज्ज, बीड यांनी आरोपी दादासाहेब मोरे यांची निर्दोष मुक्तता केली. सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. विजयकुमार देशपांडे व ॲड. राजेश देशपांडे यांनी काम पाहीले. त्यांना ॲड. पृथ्वीराज जाधव यांनी सहकार्य केले. प्रकरणाच्या निकालाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड च्या सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले होते.



## काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा देताच टप्पा वाढ निधीसाठी हालचाली गतिमान

### ...तर आंदोलन करणार –खंडेराव जगदाळे

**बीड । प्रतिनिधी**
विनाअनुदानित शाळानां दिलेल्या वाढीव २० टक्के टप्पा अनुदानासाठी निधीची तरतूद करावी या मागणीसाठी ८ आणि ९ जुलै रोजी आझाद मैदानावर ऐतिहासिक आंदोलन झाले होते. या आंदोलनाचे फलनिष्पत्ती म्हणून २५ ऑगस्ट २०२५ रोजी शासन निर्णय झाला. परंतु अद्याप ही वाढीव टप्प्याप्रमाणे अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव टप्प्याचे वेतन झाले नाही.या वाढीव टप्प्याप्रमाणे निधीची तरतूद व्हावी यासाठी अनेक दिवसापासून आजी व माजी शिक्षक आमदार यांच्यासह शिक्षक संघटना प्रयत्न करीत आहेत. परंतु शासनस्तरावर कोणतीच हालचाल होत नसल्याने विनाअनुदानित शाळा कृती समितीने वाढीव टप्पा नुसार निधीची तरतूद होऊन वेतन २० ऑक्टोबर २०२५ पूर्वी न झाल्यास २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी दिवशीच राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक आणि सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांच्या दारात काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा देण्यात आला होता. विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या या इशारा आंदोलनाची शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने दाखल घेतली. प्रत्यक्षात टप्पा वाढ निधी वितरण हालचालीस गती आली आहे. सोमवार मंगळवार पर्यंत निधी वितरणाचे आदेश राज्यातील सर्व शिक्षणाधिकारी वेतन अधीक्षक यांना दिले जाऊन प्रत्यक्ष विनाअनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतन जमा करण्याच्या कामाला गती मिळू शकते अशी माहिती सुत्रांनी दिली आहे.



## बीड हा हिंदू-मुस्लिम ऐक्याचा जिल्हा आहे : अरफात खान, शेख अनिस

**बीड । प्रतिनिधी**
बीड जिल्हा हा कायमच हिंदू-मुस्लिम ऐक्य, सौहार्द आणि बंधुभाव यासाठी ओळखला जातो. येथील सर्व समाजातील नागरिक एकत्र राहून शांततेत आपले जीवन जगत आहेत. मात्र अलीकडच्या काळात काही राजकीय आणि सामाजिक संघटनांकडून धार्मिक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील वातावरण बिघडू नये म्हणून पोलिस प्रशासनाने आ.संग्राम जगताप व अन्य लोकांच्या मोर्चास परवानगी देऊ नये अशी मागणी समाजसेवक अरफात खान व शेख अनिस यांनी केली आहे. अरफात खान व शेख अनिस म्हणाले की, बीड शहरात तमाम हिंदू-मुस्लिम आणि अठरा पगड जातीचे लोक एकत्र नांदतात. हे ऐक्यच आपल्या जिल्ह्याची खरी ताकद आहे. त्यामुळे अशा पवित्र वातावरणाला तडा देणारा कोणताही कार्यक्रम, मोर्चा किंवा सभा घेण्यास परवानगी देऊ नये. त्यांनी पुढे सांगितले की, अहमदनगर जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी धार्मिक तणाव निर्माण झाल्याचे आपण पाहिले. आता त्याच धर्तीवर बीडच्या शांततेचा भंग करण्याचा प्रयत्न काही घटक करत आहेत. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ हस्तक्षेप करून अशा कार्यक्रमांना परवानगी देऊ नये. अरफात खान व शेख अनिस यांनी बीडमधील लोकांना आवाहन केले की, आपण सर्वांनी एकत्र राहून जिल्ह्यातील सांप्रदायिक सौहार्द टिकवले पाहिजे. काही लोक समाजात मतभेद निर्माण » पान २ वर






बीड : कल्पना हॉस्पिटलचे माजी संचालक प्रसिद्ध डॉ. बालाजी केशवराव जाधव यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांना काकू नाना मेमोरियल हॉस्पिटल बीड येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी कार्यकारी मुख्याधिकारी डॉ. सय्यद बशीर, वैद्यकीय संचालक डॉ. विठ्ठल आळणे यांच्यासह सर्व डॉक्टर आणि कर्मचारी उपस्थित होते.

## जलतरण व तायक्वांदो स्पर्धेत संस्कार विद्यालयाची राज्यस्तरावर निवड

**बीड । प्रतिनिधी**
शालेय क्रीडा विभागाच्या वतीने संपन्न झालेल्या तायक्वांदो व जलतरण स्पर्धेमध्ये संस्कार विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत संस्कार विद्यालयाला विभागीय स्तरावरून थेट राज्यस्तरावर स्थान प्राप्त करून दिले .कुमारी पूर्वी मच्छिंद्र बीडकर इयत्ता आठवी या जलतरणपटूने छत्रपती संभाजी नगर विभागातून एक मीटर स्प्रिंग बोर्ड स्विमिंग मध्ये विभाग स्तरावर सर्वप्रथम क्रमांक पटकावून राज्यस्तरासाठी तिची निवड सुनिश्चित केली आहे . तर कुमारी श्रावणी झुंबर आठवले या विद्यार्थिनीने १९ वर्षाखालील शालेय गटामध्ये तायक्वांदो स्पर्धेत विभाग स्तरावर सर्वप्रथम सुयश प्राप्त करत राज्यस्तरावर धडक मारलेली आहे . संस्कार विद्यालयाच्या या गुणवंत विद्यार्थिनींनी जे सुयश प्राप्त केले आहे त्यानिमित्त संस्कार प्रबोधिनीचे संस्था अध्यक्ष डॉक्टर शरद रायते सचिव एडवोकेट के पी थिगळे व संस्कार प्रबोधिनीचे संस्था संचालक तसेच माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक विनायक जोशी पर्यवेक्षक रघुनाथ तावरे मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी तसेच पाचवी सातवी विभाग प्रमुख सुनील सोनवळकर क्रीडा शिक्षक बापू भोसले संस्कार प्रसिद्धी विभाग प्रमुख प्रेरक वैद्यसर,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# वृद्धांचा सन्मान आणि सुरक्षितता

माध्यमांनी वृद्धांचे सकारात्मक योगदान आणि त्यांचे अनुभव प्रदर्शित करून समाजातील वृद्धांविषयीचे नकारात्मक पूर्वग्रह तोडण्याचे काम केले पाहिजे; शाळांमध्ये वृद्ध सन्मान किंवा अनुभव-विनिमय कार्यक्रम राबवून तरुण पिढीमध्ये वृद्धांविषयी आदर आणि जबाबदारीची भावना रुजवावी लागेल तसेच स्थानिक समाजस्तरावर स्वयंसेवी उपक्रम, स्थानिक क्लब व सांस्कृतिक संस्थांद्वारे वृद्धांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे कार्यक्रम राबविले, तर वृद्धांचा सामाजिक सहभाग आणि आत्मसन्मान वाढेल, ज्यामुळे शोषणासाठी सामाजिक जागा कमी होतील. भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेत वृद्धांना आदर, संरक्षण आणि कुटुंबीय जबाबदारीचे स्थान दिले गेले आहे; परंतु अलीकडील राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संचालनालयाच्या (एनसीआरबी-२०२३) अहवालातील आकडेवारीने आणि त्यावर आधारित विविध माध्यमांच्या अभ्यासाने दर्शविले आहे की वृद्धांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांचे स्वरूप, प्रमाण आणि प्रसार यामध्ये लक्षणीय बदल होत आहेत. हे बदल फक्त वैयक्तिक पातळीवरील गुन्हेगिरीचे स्वरूप नाहीत, तर त्या समाजाच्या कुटुंबसंरचना, आर्थिक व्यवस्था, तंत्रज्ञानवापर आणि प्रशासनाच्या प्रतिसादाचे प्रतिबिंब आहेत. २०२३ मध्ये देशात वृद्धांविरुद्ध नोंदवलेल्या गुन्हे प्रकरणांची एकूण संख्या २७,८८६ इतकी नोंदली गेली आहे, जी २०२२ मधील वृद्धांविरुद्ध नोंदवलेल्या २८,५४५ गुन्हे प्रकरणांपेक्षा किंचित घट दर्शवते; मात्र हा सांख्यिकीय आकडा स्वतःमध्ये धोका कमी झाल्याचे दर्शवितो असे मानण्यासारखे नाही तर खरं चित्र खोल आणि मिश्र आहे कारण घट असलेल्या काही घटकांच्या पलीकडे गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण, राज्यनिहाय भिन्नता आणि डिजिटल व आर्थिक फसवणुकीत वाढ अशा धोकादायक प्रवृत्त्या दिसून येत आहेत. या आकडेवारीच्या प्राथमिक विश्लेषणात दिसते की, वृद्धांविरुद्ध नोंदलेल्या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक प्रमाण 'साधे दुखापत' किंवा शारीरिक अत्याचारांचे आहे, परंतु त्याचवेळी चोरी, ठगी/बनावट/फसवणूक आणि आर्थिक शोषण या आर्थिक स्वरूपाच्या गुन्ह्यांनी मोठ्या प्रमाणावर वृद्धांना लक्ष्य केले आहे, हे विशेषतः महत्त्वाचे आहे. कारण आर्थिक शोषण हे वृद्धांची आत्मनिर्भरता आणि मानसिक स्वास्थ्य यांना परावृत्त करते व सामाजिक पुनर्वसन ही कठीण करते. राज्यस्तरावरचे विश्लेषण असे दर्शवते की काही राज्ये आणि महानगर वारंवार उच्च नोंदीसह समोर येत आहेत; एनसीआरबी-आधारित २०२३ आकडेवारीनुसार मध्य प्रदेशमध्ये ५,७३८ प्रकरणे नोंदली गेली आणि महाराष्ट्रात ५,११५ प्रकरणे नोंदली गेली, तर तामिळनाडू व कर्नाटकसह इतर काही राज्यांतही वृद्धांविरुद्ध प्रकरणांचे प्रमाण उच्च राहिले आहे. यामुळे ह्या प्रदेशांतील स्थानिक सामाजिक रचना, कुटुंबीय संघर्ष, आर्थिक असमानता आणि पोलीस व प्रशासनाच्या प्रतिसादातील फरक या सर्वांचा सखोल अभ्यास आवश्यक होतो. महानगरांमध्येही वृद्धांविरुद्धचे गुन्हे महत्त्वाचे आहेत; दिल्ली, बंगळूरु आणि मुंबई यांसारख्या शहरांमध्ये वृद्धांविरुद्ध नोंदवलेली प्रकरणे वारंवार उच्च आढळतात व मोठ्या शहरांतील विभक्त कुटुंबसंरचना, सामाजिक अलगापन व सार्वजनिक ठिकाणी असलेली असुरक्षितता यांचा वृद्धांच्या अतीव संवेदनशीलतेशी सुसंगत संबंध आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने ह्या समस्येचे मूळ अनेक स्तरांवर आहे. पहिले आणि सर्वात थेट कारण म्हणजे कुटुंबरचना आणि पिढीगत बदल-पारंपरिक संयुक्त कुटुंबापासून विभक्त आणि एकल-व्यक्ती कुटुंबाकडे गेलेली बदलती प्रवृत्ती वृद्धांना वैयक्तिक तसेच सामाजिक आधारापासून वंचित करते; ज्यामुळे अनेक वृद्ध एकटेपणाचा अनुभव घेतात, नियमित सामाजिक निरीक्षण कमी होत म्हणून शारीरिक आणि आर्थिक शोषणाचे धोके वाढतात. दुसरे कारण, आर्थिक असुरक्षितता-अनेक ज्येष्ठ नागरिकांचे उत्पन्न मर्यादित पेन्शन, बचत वा कौटुंबिक अवलंबित्वावर अवलंबून असते; अशा आर्थिक निर्भरतेमुळे ते नातेवाइकांद्वारे होणाऱ्या दडपणाचे आणि मालमत्तेवरील दबावाचे लक्ष्य बनतात. तिसरे कारण, सामाजिक प्रतिष्ठेच्या अभावामुळे वृद्धांचे स्थान कमी झाले आहे; कामावरून निवृत्त झालेल्या व्यक्तींना कुटुंबात व समुदायात कमी महत्त्व दिले जाणे, त्यांची मते दुर्लक्षित होणे आणि निर्णय प्रक्रियेपासून त्यांना वगळणे ह्या सर्वांचा मानसिक व सामाजिक परिणाम गंभीर स्वरूपाचा असतो. चौथे कारण, तंत्रज्ञान आणि डिजिटलीकरणामुळे निर्माण झालेले नवीन प्रकारचे धोके-ऑनलाइन बँकिंग, मोबाइल पेमेंट्स, ओटीपी व कॉल स्कॅम्स यांनी वृद्धांना आर्थिक फसवणुकीसाठी अतिशय संवेदनशील केले आहे; त्यांची डिजिटल साक्षरतेची कमतरता आणि अगदी विश्वसनीय वाटणाऱ्या प्लॅटफॉर्म्सचा गैरवापर या प्रक्रियेला चालना देतो. पाचवे आणि अत्यंत निर्णायक कारण म्हणजे न्यायप्रणाली आणि अंमलबजावणीच्या प्रक्रियेत असलेली कमकुवतता-जरी Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act, २००७ सारखे कायदे अस्तित्वात असले तरी प्रत्यक्ष तक्रार नोंदविणे, पोलिसांच्या संवेदनशीलतेची कमतरता, आरोग्यामुळे पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचण्याची अडचण आणि न्यायप्रक्रियेतील मंदगती या सर्वांमुळे अनेक प्रकरणे कागदोपत्री नोंदही होत नाहीत आणि जे नोंदले जातात त्यांची तपासणी व दोषसिद्धी हळूहळू होते, ज्यामुळे पीडितांना न्याय मिळण्याचा विश्वास कमी होतो. विशेषतः आर्थिक स्वरूपाचे गुन्हे ठगी, बनावट व्यवहार, फसवणूक आणि किंग-आधारित ठगी यांची वाढ ही काळजीची बाब आहे कारण ती वृद्धांच्या आर्थिक सुरक्षिततेवर थेट हल्ला करते. एनसीआरबी आणि माध्यमिक अहवालातील आकडे दाखवतात की महानगरांमधील आणि काही राज्यांमधील तज्ज्ञ प्रकारात फसवणूक आणि बनावट व्यवहार मोठ्या प्रमाणात नोंदले गेले आहेत; अनेकदा पेन्शन खाते, बँक डिटेल्स, ओटीपी किंवा विश्वासार्ह वाटणाऱ्या कॉल्सद्वारे पैसे हस्तांतरित करण्याची सवय वापरून अनेक वृद्ध मोठ्या आर्थिक नुकसानाला सामोरे गेले. या प्रकारच्या गुन्ह्यांचा परिणाम तत्कालीन वित्तीय नुकसानांव्यतिरिक्त दीर्घकालीन मानसिक ताण, सामाजिक शत्रुता व आत्मसन्मान घट असतो. काही प्रकरणांमध्ये कोणत्याही आर्थिक मदतीला पुनरागमन कठीण ठरते आणि वृद्धांचे जीवनमान लक्षणीयरीत्या खालावत. शारीरिक अत्याचार आणि घरगुती हिंसाचाराचे स्वरूपही व्यापक आहे; अहवालात 'साधे दुखापत' या श्रेणीतील प्रकरणांची उच्च संख्या दाखवली गेली असून, घरातील कलह, पैशांसाठीचे वाद, वारसाहक्काचे तंटे किंवा जीवनसाथी/कुटुंबातील सदस्यांद्वारे होत असलेले दुर्व्यवहार ही कारणे अनेकदा समोर येतात. विशेषतः जिथे वृद्धांची आरोग्यदृष्टीने निर्भरता जास्त असते आणि सामाजिक-पारंपरिक आधार कमी झालेला असतो, तिथे घरगुती हिंसा आणि परित्यागाचे प्रकार वाढतात. येथे राज्यानिहाय फरकांचे निरीक्षण करणे आवश्यक आहे कारण ती समाजशास्त्रीय आणि प्रशासकीय निकष प्रतिबिंबित करतात. मध्य प्रदेशमध्ये २०२३ मध्ये नोंदवलेली ५,७३८ प्रकरणे आणि महाराष्ट्रातल्या ५,११५ प्रकरणांमधून दिसते की मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र या प्रदेशांमध्ये वृद्धांच्या सुरक्षेशी संबंधित समस्यांचे प्रमाण जास्त आहे. यामागील कारणांमध्ये स्थानिक कुटुंबीय संदर्भ, आर्थिक ताणतणाव, जिल्हास्तरीय रोजगार अवस्था, शहरीकरण आणि स्थानिक पोलीस व्यवस्थेची कार्यक्षमता ह्यांचा समावेश असू शकतो. तसेच छत्तीसगडसारख्या काही राज्यांत वृद्ध हत्येचे दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असल्याचे नोंदले गेले आहे, ज्यामुळे गंभीर गुन्ह्यांचा स्थानिक पॅटर्न समजून घेणे आवश्यक ठरते. महानगरांमध्ये दिल्ली, मुंबई आणि बंगळूरु यांसारख्या शहरांमध्ये वृद्धांविरुद्धच्या प्रकरणांमध्ये उत्पन्न होत असलेले बदल आणि काही शहरांमध्ये झालेली वाढ हे सूचित करतात की शहरीकृत जीवनशैलीचा वृद्धांच्या सामाजिक सुरक्षा व सहभागावर प्रतिकूल परिणाम होत आहे. या परिस्थितीत सामाजिक आणि प्रशासकीय उपाय यांची गरज तातडीची आहे आणि ते उपाय बहुआयामी असावे लागतील. कायदा आणि न्यायप्रणालीच्या पातळीवर ए नोंदणीचे नियम सुलभ करणे (उदा. घरबसल्या ऋखठ नोंदणी, मोबाइल पोलीस सेवा), वरिष्ठ नागरिकांसाठी विशेष हेल्पडेस्कची स्थापना, पोलीस प्रशिक्षणामध्ये वयोवृद्ध संवेदनशीलता समाविष्ट करणे आणि त्वरित वैद्यकीय व मानसिक सहाय्य उपलब्ध करून देणे हे प्राथमिक पावले असावीत. स्थानिक पातळीवर 'वयोवृद्ध सुरक्षा समित्या' वा 'वृद्ध सुरक्षा युनिट्स'ची स्थापना करणे जिथे समाजकार्य, पोलीस, आरोग्य व कायद्यातील प्रतिनिधी एकत्र येऊन स्थानिक समस्यांचा वेळीच शोध घेतील आणि तातडीची मदत पुरवतील अशी यंत्रणा प्रभावी ठरू शकते. आर्थिक सुरक्षेसाठी पेन्शन योजनांचे पारदर्शक व वेगवान वितरण, वयोवृद्धांना लक्षित आरोग्य विमा व आर्थिक साक्षरता कार्यक्रम, तसेच बँक आणि नान-बँक आर्थिक संस्थांकडून वृद्धांसाठी व्यवहार पुष्टीकरणाची विशेष पद्धत लागू करणे हे देखील आवश्यक आहे. या पद्धतींमुळे सायबर-ठगी व ऑनलाइन फसवणुकीवरही परिणाम होऊ शकेल.

समाजशास्त्रीय बदल घडविणे म्हणजे दीर्घकालीन काम यासाठी माध्यमे, शाळा-शिक्षण संस्था आणि समुदाय-नियोजकांची भूमिका निर्णायक आहे. माध्यमांनी वृद्धांचे सकारात्मक योगदान आणि त्यांचे अनुभव प्रदर्शित करून समाजातील वृद्धांविषयीचे नकारात्मक पूर्वग्रह तोडण्याचे काम केले पाहिजे; शाळांमध्ये 'वृद्ध सन्मान' किंवा अनुभव-विनिमय कार्यक्रम राबवून तरुण पिढीमध्ये वृद्धांविषयी आदर आणि जबाबदारीची भावना रुजवावी लागेल; तसेच स्थानिक समाजस्तरावर स्वयंसेवी उपक्रम, स्थानिक क्लब व सांस्कृतिक संस्थांद्वारे वृद्धांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे कार्यक्रम राबविले तर वृद्धाचा सामाजिक सहभाग आणि आत्मसन्मान वाढेल, ज्यामुळे शोषणासाठी सामाजिक जागा कमी होतील. याशिवाय सामाजिक निर्बंध, कुटुंबीय दायित्वांची पुनर्बांधणी आणि आर्थिक सहभाग वृद्धांना अधिक सक्षम करतील. महत्त्वाचे म्हणजे एनसीआरबीकडून प्रकाशित झालेली आकडेवारी ही केवळ दिशादर्शक आहे पण वास्तविकतेतील अनेक प्रकरणे नोंद न झाल्यामुळे ती पूर्ण चित्र दर्शवत नाहीत. अनेक वृद्ध सामाजिक लज्जा, कुटुंबीय दबाव किंवा आरोग्य कारणास्तव तक्रार नोंदवण्यापासून दूर राहतात; म्हणून स्थानिक स्तरावर सर्वेक्षण, नागरिक मूहांकडून गोळा केलेला अनुभव आणि स्वयंसेवी संस्थांचा डेटा धोरणनिर्मितीत समाविष्ट करणे आवश्यक आहे, ज्यायोगे संख्यात्मक डेटाच्या पलीकडे असलेल्या सामाजिक वास्तवाचा अभ्यास करता येईल. तसेच दोषारोप सिद्धी आणि शिक्षा प्रक्रियेत वेग आणणे हे देखील गरजेचे आहे कारण आरोपींना योग्य वेळी शिक्षा न मिळाल्यास पुनरावृत्तीची शक्यता वाढते आणि पीडितांचा न्यायप्रणालीवरील विश्वास ढासळतो. शेवटी, निष्कर्ष म्हणून असे म्हणता येईल की एनसीआरबीच्या ताज्या आकडेवारीने जे द्योतक दर्शविले आहेत. राज्यनिहाय फरक, महानगरांमधील धोके, आर्थिक व डिजिटल फसवणुकीची वाढ आणि घरगुती हिंसाचाराचे विषारी स्वरूप हे केवळ तात्पुरते सामाजिक प्रश्न नाहीत, तर व्यापक धोरणात्मक, प्रशासकीय आणि सांस्कृतिक हस्तक्षेपांची गरज ओळखून तीव्रपणे हाताळली पाहिजे. जर शासन, स्थानिक संस्था, बँका, शैक्षणिक संस्था आणि माध्यमे यांनी समन्वित प्रयत्न केले, तर वृद्धांना केवळ कायदा आणि पोलीस संरक्षण नसून, आर्थिक सुरक्षितता, डिजिटल साक्षरता, मानसिक आरोग्य समर्थन आणि सामाजिक प्रतिष्ठा ह्या सर्व बाजूंनी बळकटी मिळू शकते. यामुळे वृद्धांचा सन्मान आणि सुरक्षितता सुनिश्चित होईल आणि समाजाचे नैतिक व सामाजिक आरोग्य सुधारले जाईल. एनसीआरबीच्या अहवालाने वाजवलेली या संदर्भातील धोक्याची घंटा जर आपण ऐकली आणि धाडसाने काम केले तरच आमचे ज्येष्ठ नागरिक सुरक्षित, सन्मानित आणि सहभागी जीवन जगण्यासाठी स्वायत्त होतील; अन्यथा या आकडेवारीमागील गंभीर संकेत दीर्घकाळासाठी समाजाला मोलाचे नुकसान करू शकतात.

# उर्दू शिक्षकांच्या पदोन्नती व पदभरतीला वेग द्या

## शिक्षण अधिकाऱ्यांकडे संघटनेची ठाम मागणी

**बीड । प्रतिनिधी**

उर्दू माध्यमातील शिक्षकांच्या पदोन्नती व रिक्त पदभरतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित राहिल्याने शिक्षकवर्गात तीव्र नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या प्रतिनिधीमंडळाने जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद बीड, मा. भगवान फुलारी साहेब यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. संघटनेचे जिल्हाध्यक्ष काझी मुशाहेद, कार्याध्यक्ष उस्मान खान, आणि जिल्हा संघटक शेख इमरान यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या भेटीत उर्दू माध्यमाशी संबंधित विविध शैक्षणिक व प्रशासकीय प्रश्नांवर सखोल चर्चा झाली.



# धानोरा महाविद्यालयाच्या चिराग शिंगाडे याची बुद्धिबळ विभागीय स्पर्धेसाठी निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा (ता आष्टी) येथील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावीचा विद्यार्थी चिराग शिंगाडे याची शुक्रवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी हिंगोली येथे होणाऱ्या विभागीय बुद्धीबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. धानोरा येथील कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंनी यावर्षीही विविध स्पर्धेमध्ये बाजी मारली आहे. या महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी झालेले आहेत. चिराग शिंगाडे याने यापूर्वीही अनेक स्पर्धा गाजवलेल्या आहेत. बुधवार दि ८ ऑक्टोबर रोजी बीड येथे झालेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. चिराग शिंगाडे याच्या निवडीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब, प्रशासन अधिकारी शिवदास विधाते, डॉ.डी बी राऊत, माऊली बोडखे, संजय शेंडे, प्रा. डॉ सागर वाघुले, प्रा संदीप ननवरे, सिनेट सदस्य डॉ अजय दादा धोंडे,



अभयराजे धोंडे, प्राचार्य भगवान वाघुले, उपप्राचार्य गहिनीनाथ एकशिंगे, स्टाफ सेक्रेटरी प्रा. निसार शेख, प्रा रत्नमाला तरटे, प्रा शबाना शेख, प्रा राजू शेलार, प्रा सुभाष मोरे, प्रा आजिनाथ गिलचे, प्रा राजेंद्र मिसाळ, प्रा ज्ञानदेव बोडखे, प्रा विवेक महाजन, प्रा आतेश बनसोडे, प्रा गोरक्षनाथ वाळके, प्रा सतीश तागड, प्रा नितीन बाळशंकर, प्रा डॉ उस्मानखा पठाण, प्रा डॉ सुभाष नागरगोजे, प्रा अंजना गिरी, प्रा अमर शेख, प्रा डॉ संजय झांजे, प्रा अम्रीत ज्ञानेश्वर, कार्यालयीन अधीक्षक म्हसू अरुण आदींनी शुक्रवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी हिंगोली येथे होणाऱ्या विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी चिराग याचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा दिल्या. चिराग शिंगाडे याला शारीरिक शिक्षण विभागाचे प्रा डॉ सुभाष नागरगोजे, उपप्राचार्य गहिनीनाथ एकशिंगे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

## पान १ आणि ४ वरुन...

### प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच...

कामाला लागा. लोकांना काम करून दाखवायचे आहे. लोकांचे काम केले तर लोक डोक्यावर घेतील. लोकांशी संवाद साधून त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी तत्पर रहा. प्रत्येक वॉर्डात कार्यकर्त्यांनी समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. येणाऱ्या नगर पालिकेच्या निवडणुकीत पक्ष प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. तसेच बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष पदाचा आपलाच उमेदवार हा १० हजार मताने निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच सर्व जागेवर नगरसेवक निवडून येतील. आमदारकीच्या निवडणुकीत सोबत राहिलेल्या आणि माझ्यासाठी एकनिष्ठ प्रामाणिक राहून काम करणाऱ्या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांसाठी घरातला सदस्य समजून काम करून निवडून आणणार ते असल्याचे सांगून कार्यकर्त्यांना बळ दिले यावेळी आ.संदीप क्षीरसागरांना देखील कार्यकर्त्यांनी देखील आ.संदीप भैय्या जो उमेदवार देतील त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम, पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राष्ट्रीय बाल स्वास्थ्य...

नियुक्त कर्मचाऱ्यावर कोणाचेच अंकुश नसल्यामुळे सदरील कर्मचारी फुकटचे पेमेंट उचलत असून काहीच कामे न करता फक्त कागदोपत्री माहिती भरून शासनाची फसवणूक करीत आहेत यातही काही शाळेच्या मुख्याध्यापक व इतर अंगणवाडी सेविका व सुपरवायझर यांच्या सहकार्याने एखाद्या मुलाला काही असाद्य रोग आहे हे निदर्शनास आल्यानंतर त्यांचे मुंबई पुणे येथे ते ऑपरेशन करून स्वतःची पाठ थोपटून घेत वर्तमानपत्रात बातम्या देऊन आम्ही किती चांगले काम करत आहोत हे दर्शविण्याचा प्रयत्न करीत आहे. तरी सदरील योजनेचे अध्यक्ष हे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी असून सचिव जिल्हा आरोग्य अधिकारी आहेत परंतु या दोघांचेही या गंभीर बाबीकडे संपूर्ण दुर्लक्ष आहे.

तरी या चांगल्या योजनेचा बीड जिल्ह्यात होणारा कागदोपत्री वापर तसेच या योजनेच्या माध्यमातून नेमणुकीस असणाऱ्या डॉक्टर फार्मासिस्ट स्टाफ नर्स तसेच इतर स्टाफ व या योजने करिता होणारा बोगस औषध पुरवठा तसेच फोरविलर गाडीचे टेंडर यातून शासनाचे होणारी कोट्यावधीची लूट थांबून सदरील योजनेतील गैरव्यवहार तपासण्याकरिता एक चौकशी समिती नियुक्त करण्यात यावी यासाठी टिपू सुलतान युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष अँड. इरफान बागवान यांनी मा. देवेंद्रजी फडवणीस मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे जर येत्या आठ दिवसात चौकशी समिती नेमण्यात आली नाही व या सर्व प्रकारात समाविष्ट असणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्यात आली नाही तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा टिपू सुलतान युवा मंचाचे संस्थापक अध्यक्ष इरफान बागवान यांनी दिला आहे.

### सीसीआयची कापूस खरेदी...

ही सर्वाधिक केंद्र संख्या आहे. वस्त्रोद्योग मंत्रालयाने राज्यनिहाय कापूस खरेदीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. मध्य विभागात गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश व ओडिशा येथे १५ ऑक्टोबरपासून खरेदीला प्रारंभ होईल. यंदाची संपूर्ण खरेदी प्रक्रिया पारदर्शक आणि शेतकरी-स्नेही करण्यासाठी 'कपास-किसान' पवरून नोंदणी करण्यात येईल. शेतकऱ्यांना ऑनलाइन नोंदणी अडचणीची ठरण्याची शक्यता आहे. यासह आतापर्यंत सीसीआय कापूस खरेदी करताना १२ टक्क्यांपेक्षा कमी आर्द्रता असलेला कापूस खरेदी करीत असते. मात्र, यंदा अतिवृष्टीमुळे कापूस ओला झाल्याने विभागातील निम्म्यापेक्षा जास्त कापसात आर्द्रतेचे प्रमाण राहण्याची शक्यता असल्याने या निकषात बसणे अवघड आहे.

### शहरातील अंगणवाड्यात...

आहेत.बीड शहरातील काही अंगणवाड्यामध्ये गरोदर मातांची नोंदणी करण्यास अंगणवाडी सेविका टाळाटाळ केली जात असल्याचा गंभीर प्रकार देखील समोर आला आहे,याशिवाय गरोदर मातांची नोंदणी वेळेवर न करता, त्यांच्या नावाने मिळणारा शासन पोषण आहार वाटप टाळले जात असल्याचीही धक्कादायक बाब समोर आली आहे. नवजात बालकांना मिळणारी 'जन्म किट' देखील काही ठिकाणी वितरित करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे. अंगणवाड्यामध्ये पोलिओ डोस देण्याची प्रक्रिया राबवली जाते पोलिओ डोस देताना बालकाचे वजन करणे आवश्यक असून अंगणवाड्यात वजन काटा नसल्याची बाब समोर आली आहे. तसेच महिला प्रसूती झाल्यानंतर दिली जाणारी बेबी किट यामध्ये एक बॅग मच्छरदाणी,खेळणी व बाळाचे कपडे यासह इतर साहित्य दिली जात नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत.याकडेही संबंधित विभागाने लक्ष देण्याची गरज आहे.बालकांना दिला जाणारा खाऊ(सुकडी,तांदूळ खिचडी) व भात शिजवून दिला जात नसून तो आहार देखील अंगणवाडी सेवकीच्या घरी जातो.या प्रकरणावर तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी नागरिक आणि पालक जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांकडे करणार आहेत. बीड शहरातील सर्व अंगणवाडी ह्या सीसीटीव्हीच्या निगराणीखाली करण्यात याव्यात अशी देखील मागणी होत आहे. बालविकास अधिकाऱ्यांनी शहरातील अंगणवाडी मध्ये गरोदर माताची नोंद टाळाटाळ करणाऱ्या सेविकांची चौकशी करून दोषीं अंगणवाडी सेविकावर कठोर कारवाई करावी व अंगणवाडी सीसीटीव्हीच्या निगराणी खाली कराव्यात म्हणजे अंगणवाडीतील सत्य परिस्थिती समोर येईल अशी मागणी मनसेचे सचिव सोमेश्वर कदम यांनी बीड जिल्हाधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना निवेदनातून केली आहे.

### बीड हा हिंदू-मुस्लिम...

करण्याचा प्रयत्न करतील, पण आपण त्यांना यशस्वी होऊ देऊ नये. बीड जिल्हा हा नेहमीच ऐक्याचा आणि शांततेचा संदेश देणारा जिल्हा राहिला आहे. शेवटी त्यांनी पोलिस प्रशासनाकडे मागणी केली की, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कोणत्याही प्रकारचा धार्मिक तणाव निर्माण करणाऱ्या मोर्चांना परवानगी देऊ नये. सर्व धर्मांचे लोक शांततेने आणि प्रेमाने जगावेत, हीच बीडच्या जनतेची खरी ओळख आहे.

# शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसा निमित्त पाटोद्यात काव्यवाचन स्पर्धा

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या राजकारणातील भीष्म पितामह, सहकार व शिक्षणमहर्षी श्री. शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त सोमवारी दि. १३ ऑक्टोबर रोजी पाटोदा येथे आंतरमहाविद्यालयीन विभागीय काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. विश्वास कदम आणि प्र. प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे यांनी दिली आहे. जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाटोदा येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभाग, सांस्कृतिक विभाग आणि विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने या काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम अनुक्रमे पाच हजार रुपये, तीन हजार रुपये व दोन हजार रुपये अशी पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. त्याचसोबत स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्रही देण्यात येणार आहे. सदरील स्पर्धेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या

स्पर्धकांना निमंत्रीत करण्यात आले असून स्पर्धेची जय्यत तयारी सुरू आहे. या स्पर्धेचे समन्वयक प्रा. बापू घोक्षे (९४२०८१६६६६), डॉ. रामकृष्ण प्रधान (९५२७३८८१५६), डॉ. कल्पना घारगे (९४२३७१६१७१), डॉ. अशोक देवगुडे (८६६८२७१५१९) यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मानवतेचा हात!

## जैन स्वयंसेवक मंडळ व गुरु आनंद महिला प्रतिष्ठानचा हृदयस्पर्शी उपक्रम

### शहाजनपूर, शिरसमार्ग, तरटेवाडी, दिमाखवाडी, काळवाडी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना किराणा वाटप



**बीड । प्रतिनिधी**

पूरग्रस्तांच्या अश्रूंना दिलासा देणारा आणि मानवतेचा अद्भुत संदेश देणारा एक हृदयस्पर्शी उपक्रम बीड जिल्ह्यात राबविण्यात आला. श्री मुंबई जैन स्वयंसेवक मंडळ, गुलालवाडी (मुंबई) यांच्या सहकार्याने गुरु आनंद महिला प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने पूरग्रस्त शेतकरी बांधवांना जीवनावश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. शहाजनपूर, शिरसमार्ग, तरटेवाडी, दिमाखवाडी आणि काळवाडी या पंचक्रोशीतील शेतकरी कुटुंबांना या मदतीचा लाभ मिळाला. पूरामुळे संकटात सापडलेल्या अनेक कुटुंबांना या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले. वाटप करण्यात आलेल्या किराणा किट्समध्ये गहू, तांदूळ, साखर, गूळ, दाळ, रवा, तेल, चहा पत्ती आदी जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता. या सामाजिक उपक्रमात समीरभाई शहा, श्री. विशालजी शहा आणि श्री. दीपकभाई डोशी यांनी पुढाकार घेत पूरग्रस्त शेतकरी बांधवांना मदतीचा हात दिला. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत म्हटले की, मानवतेचे संवेदनशील दर्शन घडवणारा

हा उपक्रम पूरग्रस्तांसाठी आशेचा किरण ठरला आहे. मानवतेचा संगम, संवेदनांचा स्पर्श आणि समाजबंधाची जाणीव – हाच गुरु आनंद महिला प्रतिष्ठान व जैन स्वयंसेवक मंडळ यांच्या कार्याचा खरा चेहरा ठरला आहे.

# छाया पांचाळ मृत्यू प्रकरणी विभागीय आरोग्य कार्यालयात किस्किंदा पांचाळ यांची धाव

## श्रीधर पाठक, मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक विभागीय आरोग्य कार्यालय लातूर यांना किस्किंदा पांचाळ यांचे निवेदन



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयात प्रसुतीदरम्यान मृत्यूमुखी पडलेल्या छाया गणेश पांचाळ (वय २५, रा. आंबिलवडगाव, ता. जि. बीड) यांच्या मृत्यू प्रकरणात मुख्य दोषींवर कारवाई न करता केवळ मावशीवर अन्यायकारक निलंबन करण्यात आल्याचा आरोप किस्किंदा पांचाळ यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी मा. श्रीधर पाठक, मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक विभागीय आरोग्य कार्यालय लातूर यांना आज लेखी निवेदन सादर केले. उपसंचालक परिमंडळ कार्यालय लातूर येथील मा. श्रीधर पाठक यांनी या प्रकरणी चौकशी समितीकडून अहवाल अद्याप प्राप्त झालेला नसल्याचे स्पष्ट केले असून, आतापर्यंत अहवाल यायला हवा होता; मात्र समितीने तो सादर केलेला नाही, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, किस्किंदा पांचाळ यांनी आठ दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास लातूर येथील उपसंचालक कार्यालयासमोर 'बोंबामारो आंदोलन' आणि उपसंचालकांना काळे फासण्याचा इशारा दिला आहे. छाया पांचाळ यांचा मृत्यू आणि चौकशी १३ एप्रिल २०२५ रोजी प्रसुतीनंतर अतिरक्तस्रावामुळे छाया पांचाळ यांचा बीड जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला. या प्रकरणी वैद्यकीय अधिकारी आणि नर्स यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मृत महिलेच्या भावाने पोलीस ठाण्यात लेखी तक्रारही दाखल केली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी डॉ. अर्चना भोसले-कीर्तक (अध्यक्ष, उपसंचालक आरोग्य सेवा लातूर परिमंडळ) यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समिती नेमण्यात आली होती.

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे संस्थापक अध्यक्ष मा.आर.जी. कानडे जीवन गौरव पुरस्कार

## राधाकृष्ण विखे पाटील जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान



**माजलगाव । प्रतिनिधी**

दि. ९ ऑक्टोंबर रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी फेडरेशन व नॅशनल फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट च्या संयुक्त विद्यमाने आशिया अखंडातील सर्वात मोठी असलेलेली बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीचे मार्गदर्शक,आधारस्तंभ, मा.राधेशामजी चांडक हे ७५ व्या वर्षात पदार्पण करत असल्याबद्दल अमृत महोत्सव सोहळा कार्यक्रम सहकार मंदिर बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला होता. सदरील अमृत सोहळा कार्यक्रमांमध्ये माजलगावचे भूषण,सहकार रत्न, श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे संस्थापक अध्यक्ष श्री.आर.जी कानडे साहेब यांना मा. नामदार राधाकृष्ण विखे पाटील जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन व राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षांनिमित्त प्रथमच महाराष्ट्रातील सहकार चळवळ सक्षमीकरण करण्याकरिता आपले अमूल्य व महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यासाठी हा पुरस्कार वितरीत करण्याचा ठराव घेण्यात आला. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व पतसंस्था व मल्टीस्टेट यांच्याशी समन्वय व विचारविनिमय करून प्रथम पुरस्काराचे मानकरी म्हणून श्री आर जी कानडे यांना नामांकित करण्यात आले.

# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयीन युवक युतीने मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा : प्रा.बबनराव आंधळे

**बीड । प्रतिनिधी**



आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष २०२५ चे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात सहकारी शिक्षण, प्रशिक्षण, प्रचार व प्रसिद्धीचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड व बीड जिल्हा सहकारी बोर्ड लिमिटेड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दिनांक १३.१०.२०२५ वार सोमवार रोजी सकाळी ठीक १०.३० ते संपेपर्यंत आय. सी. हॉल के. एस. के. महाविद्यालय बीड या ठिकाणी करण्यात आले आहे या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा विषय सहकारातून समृद्धी असा आहे या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या स्पर्धकास महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्यावतीने प्रथम क्रमांकास १००० रुपये व बीड जिल्हा सहकार बोर्डाकडून स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे तसेच द्वितीय स्पर्धकास ५०० रुपये तसेच प्रथम येणाऱ्या स्पर्धकास महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्या वतीने माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होता येणार आहे स्पर्धेत सहभागी झाल्यानंतर नियमाप्रमाणे प्रवास भत्ता अदा करण्यात येणार आहे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या अटी व नियम खालील प्रमाणे आहेत. स्पर्धेचा विषय सहकारातून समृद्धी या विषयाव्यतिरिक्त इतर विषयावर वक्तृत्व करता येणार नाही. या स्पर्धेसाठी वरिष्ठ महाविद्यालयातील युवक युती पात्र असतील. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या युवक युवती ना महाविद्यालयाचे पत्र किंवा त्यांचे ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सदरली स्पर्धेचे प्रवेश शुल्क प्रति स्पर्धक १०० रुपये असून एका प्रतिनिधीस स्वतःच्या नावावर केवळ एकदाच प्रवेश शुल्क भरता येईल. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रतिनिधीस ७+३=१० मिनिटे वेळ देण्यात येईल. एकदा वक्तृत्व सादर केल्यानंतर पुन्हा संधी देण्यात येणार नाही. विजेत्या स्पर्धकाच्या घोषणेबाबत माननीय परीक्षकाचा निर्णय हा अंतिम असेल. स्पर्धा संपल्यानंतर तीस मिनिटांमध्ये विजेत्या स्पर्धकाची घोषणा करून पारितोषिक वितरण समारंभ माननीय प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते घेण्यात येईल विजेत्या स्पर्धकाची मुलाखत घेऊन पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे यांना पाठविण्यात येईल वरील सर्व अटीस अधीन राहून जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा पार पाडण्यात येतील स्पर्धेत भाग घेणाऱ्या महाविद्यालयीन युवक युतींनी प्रवेश शुल्काची रक्कम रुपये १०० स्पर्धेच्या किमान एक दिवस अगोदर श्री आर डी वाघमारे साहेब जिल्हा सहकार विकास अधिकारी नगर रोड बीड मोबाईल नंबर ९८ ९० ३७ ९६ ९१ व श्री पी. ए. कदम साहेब सहकार विकास अधिकारी, यांच्याकडे जमा करावी मोबाईल नंबर ९४ २१ ३५ ८८ ६५ ज्या स्पर्धकांना या स्पर्धेत भाग घ्यावयाचा आहे त्या स्पर्धकांनी लवकरात लवकर नोंदणी करून सदरील स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे सर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे

# सोलापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरी अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित रहा : प्रा.गोविंद जाधव

**घाटनांदूर । प्रतिनिधी**



माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये प्रत्येक विद्यार्थी ज्ञानाने, गुणवंतेने खंबीरपणे उभा राहण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या खाजगी शिकवणी साठी गत सहा वर्षापासून अविरत कार्यकरणाऱ्या कोचिंग क्लासेस असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे सहावे राज्यस्तरीय अधिवेशन सोलापूर येथे मोठ्या उत्साहात साजरे होणार आहे त्यासाठी सर्व कोचिंग क्लासेस संचालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष प्रा वाघ,संयोजक प्रा काशिनाथ भतगुणकी, बीड जिल्हाध्यक्ष प्रा गोविंद जाधव यांनी केले आहे. कोचिंग क्लासेस असोसिएशनचे रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत व्ही. व्ही.पी. कॉलेज, सोरेगाव, सोलापूर येथे राज्यस्तरीय सहावे अधिवेशन होणार आहे. या कार्यक्रमात पूग्रस्तांना मदत, मान्यवरांचा सत्कार व पुरस्कार वितरण सोहळादेखील होणार आहे,या अधिवेशनमध्ये खाजगी कोचिंग क्लास संचालकांच्या विविध समस्या व आव्हाने यावर चर्चा, परिसंवाद, खुली चर्चा होणार असून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व जीवनगौरव पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते वितरण होणार आहे. अश्या भव्य दिव्य स्वरूपात होणाऱ्या राज्यस्तरीय अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राज्य कमिटी तर्फे करण्यात आले आहे.



## माझी शाळा, माझा अभिमान जिल्हा परिषद येळंब घाट शाळेत नवीन शिक्षकांचे स्वागत, बेंच वाटप, आणि हिंदुस्थान फीड्स प्रा.लि.बारामती व श्री दिनेश कदम यांच्या तर्फे

# वही व पेन वाटप

**येळब घाट । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येळंबघाट या शाळेमध्ये नव्याने नियुक्त झालेले मुख्याध्यापक श्री वाघमारे टी यु सर व इतर सर्व स्टाफ यांचा ग्रामपंचायत येळंबघाटच्या वतीने स्वागत करण्यात आले. ग्रामपंचायत येळंब घाट व शिवराज मित्रपरिवार तर्फे शाळेला ३५ बेंच चा दुसरा टप्पा वितरित करण्यात आला. यापूर्वी पहिल्या टप्प्यामध्ये शाळेला ३० बेंच देण्यात आले होते. हिंदुस्तान फीड्स प्रायव्हेट लिमिटेड बारामती व दिनेश कदम यांच्या तर्फे येळंबघाट जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना १३०० वह्या व प्रत्येकी पेन यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रम प्रसंगी जिल्हा दूध संघाचे चेअरमन तानाजी आबा कदम, येळंबघाट ग्रामपंचायतच्या सरपंच सौ सरिता दिनेश कदम,यांनी मार्गदर्शन केले. प्रसिद्ध व्यवसायिक दिनेश जी कदम, उपसरपंच श्री समाधानजी वंजारे हिंदुस्तान फीड्स प्रायव्हेट लिमिटेड चे अधिकारी नितीन समुद्रे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल चादर, नितीनजी ढाणे, राम सर, बाळासाहेब शिनगारे, सौ.सगुना बाळासाहेब शिनगारे, दैवशाला दिलीप चादर, प्रतुल कदम, प्रशांत कदम, विष्णू फौजी, ग्रामसेवक दशरथ जी भोसले,भाऊसाहेब कदम, हनुमंत चादर, नानासाहेब झांबरे,किरण देशमुख, महादेव चादर, प्रदीप कदम, युवराज काळे संतोष चादर, पांडू तात्या अंकुशे तसेच पत्रकार अरबाज आतार इ. मान्यवर उपस्थित होते. गुणवत्तेबरोबरच भौतिक सुविधाही शाळेला आवश्यक असतात म्हणूनच सर्व ग्रामस्थ व ग्रामपंचायत येळंबघाट यांच्यातर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

# सायबर फ्रॉडमध्ये अडकलेले पैसे ॲड.आदर्श जाधव यांच्या प्रयत्नाने व न्यायालयाच्या आदेशाने परत



**बीड । प्रतिनिधी**

सायबर फसवणुकीच्या प्रकरणात अडकलेले पैसे ड्व्होकेट आदर्श जाधव (जिल्हा व सत्र न्यायालय, बीड) यांच्या कायदेशीर प्रयत्नांमुळे आणि न्यायालयाच्या आदेशाने तक्रारदारास परत मिळाले आहेत. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता (इछडड कलम ५०३) अंतर्गत आवश्यक नोंद घेऊन कार्यवाही करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, एका नागरिकाच्या बँक खात्यातून ऑनलाईन फसवणुकीद्वारे काही रक्कम कपात झाली होती. तक्रार प्राप्त झाल्यानंतर ड. जाधव यांनी सायबर पोलिस ठाणे, बँक अधिकारी आणि पेमेंट गेटवे संस्थांशी समन्वय साधून संपूर्ण प्रक्रिया कायदेशीर मार्गाने पुढे नेली. यानंतर त्यांनी हे प्रकरण न्यायालयात दाखल करून, सादर केलेल्या कागदपत्रांवरून न्यायालयाकडून आदेश प्राप्त केला. त्या आदेशानुसार गोठवलेली रक्कम अधिकृतपणे तक्रारदाराच्या खात्यात परत करण्यात आली. या संपूर्ण कार्यवाहीदरम्यान ॲड. आदर्श जाधव यांना ॲड. अशोक मुंढे तसेच ॲड. तुषार विधाते यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे ही कायदेशीर प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होऊ शकली. या प्रयत्नामुळे तक्रारदारास न्याय मिळाला असून, स्थानिक नागरिक तसेच न्याय क्षेत्रातून तिघाही ड्व्होकेट्सच्या कार्याचे मोठे कौतुक होत आहे. सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ॲड. आदर्श जाधव यांनी जनतेस आवाहन केले आहे की, ऑनलाईन व्यवहार करताना पूर्ण सावधगिरी बाळगा, आणि फसवणुकीचा प्रसंग उद्धवल्यास तत्काळ सायबर पोलिस तसेच ड्व्होकेटचा सल्ला घ्या.

## बबनराव घोलप यांच्या वाढदिवसानिमित्त

# अतिवृष्टी ग्रस्त पूरग्रस्त पालावरील महिलांना साडी वाटप : घोडके

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ माजलगाव जिल्हा बीड च्या वतीने राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त अतिवृष्टी ग्रस्त, पूरग्रस्त, पालवरील महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रम दिनांक १०/१०/२५ रोजी श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी कँप माजलगाव येथे आयोजित करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरद पवार गट माजलगाव मतदार संघाचे नेते मोहनराव जगताप कार्यक्रमाचे उद्घाटक महिला जिल्हाध्यक्षा सौ शारदा ताई वाघमारे प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नेते शरद पवार गट सुनील शिंदे, कृष उ बा समीती सचिव हारीभाऊ सवने, सद् धम्म सेवा संघ अध्यक्ष सदाशिव भालेराव सर,संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष तुकाराम नावडकर या सर्वांच्या वतीने गौतम बुद्ध, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर,श्रीरोमनी गुरू रविदास महाराज यांचे पुजण करून सर्व पाहुण्यांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली कार्यक्रमाची प्रस्तावना करीत असताना जिल्हाध्यक्षा नानासाहेब घोडके यांनी आज जि अतिवृष्टी मुळे नुकसान झाली गोरीब



बेघर झाले कोनस कपडया लत्त्याची नास धुस त्यामुळे मा.बबनराव घोलप साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त या सर्व आपत्ती ग्रस्त महिलांसाठी साडी वाटप व जेवनाचा करण्याचा निर्णय घेऊन या पुढे ही अपत्ती ग्रस्ताना गोरगरीब मजुर लोकांना आधार देण्याचे काम करू असे आश्वासन दिले महिला जिल्हाध्यक्षा सौ शारदा ताई वाघमारे यांनी घोलप साहेब यांच्या कार्याचा संदर्भा देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# मराठी ही केवळ भाषा नाही, ती आपल्या अस्मितेचा श्वास : काळे

**बीड । प्रतिनिधी**

नवविकास मंडळ संचालित आदर्श वाचनालय, माजलगाव – माजलगावची वाचन चळवळ जिवंत ठेवणारे 'अ' दर्जाचे वाचनालय – यांच्या वतीने अनंत भालेराव सभागृह, महात्मा फुले विद्यालय येथे अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. के. एल. मोताळे सर होते. प्रमुख पाहुण्या म्हणून प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. ज्योत्स्ना कुलकर्णी मॅडम, तसेच विशेष उपस्थिती माध्यमिक विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. एस. एस. देशमुख सर यांची होती. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध कवी प्रवीण काळे यांनी नव्या पिढीची मराठी भाषा, मराठीला प्राप्त अभिजात दर्जा आणि अभिजात भाषेचे महत्त्व या विषयांवर विचारप्रवर्तक मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषेचे




वैभव, तिचा अभिमान आणि संवर्धनाची गरज यावर प्रकाश टाकला. मराठी ही केवळ भाषा नाही, ती आपल्या अस्मितेचा श्वास आहे! हे त्यांचे वाक्य संपूर्ण कार्यक्रमाचा आत्मा ठरले. त्यांच्या कवितांनी उपस्थितांच्या मनात मराठीप्रेमाची ज्योत प्रज्वलित केली.विद्यालयाचे पर्यवेक्षक एस. एस देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष समारोप मुख्याध्यापक के.एल. मोताळे सर यांनी केला.

# आजची जीवनपद्धती डबल स्टँडर्ड : अनिल कटके



**गेवराई । प्रतिनिधी**

दिनांक ०६/१०/२०२५ रोजी विविध क्षेत्रातील सन्माननीय सत्कार मूर्ती च्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा सत्कार मूर्ती सन्माननीय अनिल जी. कटके साहेब उपविभागीय पोलिस अधिकारी गेवराई यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी दुसरे सत्कारमूर्ती नितीनजी शेटे उपस्थित होते. तसेच बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष तथा श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई अध्यक्ष श्री अनिल बोर्डे उपस्थित त्याप्रसंगी सर्व सन्माननीय ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते विशेषतः महिला वर्ग यांचीही उपस्थिती होती. त्यानंतर कार्यक्रमाचे सन्माननीय अध्यक्ष तथा सत्कार मूर्ती अनिल जी कटके साहेब यांचा सत्कार शाल श्रीफळ व भुके देऊन अनिल बोर्डे यांनी त्यांचा सत्कार केला. तसेच शिव कर्म गणेश मंडळ गेवराई यांनी साजरा केलेल्या संस्कार व समाज उपयोगी गणेश उत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांचं सत्कार ज्येष्ठ श्री चपळगावकर यांनी केला.



येळब घाट – बीड तालुक्यातील येळंब घाट येथील समाधानजी वंजारे यांची ग्रामपंचायत येळंब घाट च्या उप सरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल येळंब घाट येथील वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शुभेच्छा देण्यात आले.

# एमपीएससीतून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नियुक्ती

## नौशाद अत्तार ने जिद्द व चिकाटीच्या बळावर मिळविली नोकरी

**बीड । प्रतिनिधी**

नौशाद जब्बार अत्तार या गुणी विद्यार्थ्याने जिद्द, मेहनत व चिकाटीने एमपीएससी ची परीक्षा देऊन त्यात गुणवत्तेच्या बळावर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) बीड येथे लिपिक पदावर नियुक्ती मिळविली. या यशाबद्दल ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी त्यांचा पुष्पगुच्छ व शालसह पेढे भरवून हृदयी सत्कार केला. या छोटे खानी सत्कार कार्यक्रमात त्यांचे भाऊ वृत्तपत्र क्षेत्रातील संगणक तज्ञ इर्शाद अत्तार, शेख लईख़, जलील शेख, कांडेकर, बाळू, किशोर जोगदंड आदींची प्रमुख उपस्थिती होती. नौशाद अत्तार यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत एमपीएससीची परीक्षा दिली आणि त्यात उत्तीर्ण होऊन त्यांनी स्वबळावर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत लिपिक पदावर नियुक्ती मिळविली. त्यांच्या या यशाबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



दै.बीड सुपरफास्ट
www.beedsuperfast.com
रविवार दि. १२ ऑक्टोबर, २०२५ पान ४



बीड :– जमाते ए इस्लामी हिंद यांच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेत मिल्लिया गर्ल्स स्कूल,भालदारपुरा शाळेची विद्यार्थिनी सबा नजीर शेख ही प्रथम आली असून तीचे स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल तिचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

# आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने १०० रुग्णांना ८२ लाखांची मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत

## आ.धस यांच्या माध्यमातून अमर वाळके यांची उल्लेखनीय कामगिरी



**आष्टी | प्रतिनिधी**
दु:खात असलेल्या माणसाला आधार देणं, हेच खरं देवपूजेचं काम आहे, या भावनेला साकार करत मराठवाडा भूषण, लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आणि प्रेरणेने 'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' या ग्रुपने गेल्या एका वर्षात समाजात एक आदर्श निर्माण केला असून या कालावधीत या ग्रुपच्या माध्यमातून १०० रुग्णांना तब्बल ८२ लाखांची आर्थिक मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व विविध शासकीय योजनांमधून मिळवून देण्यात आली. ही मदत फक्त आर्थिक नव्हे, तर प्रत्येक रुग्णाच्या जीवनात पुन्हा आशेचा किरण निर्माण करणारा आ.सुरेश धस यांचा संवेदनशील प्रयत्न ठरला आहे. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' ग्रुपचे कार्यकर्ते रुग्णसेवक अमर वाळके हे रुग्णांच्या उपचारासाठी लागणारी कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, शासकीय योजना, तसेच वैद्यकीय सल्ला या सर्व टप्प्यांवर रुग्णांच्या सोबत राहून मार्गदर्शन करतात. त्यामुळे शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ प्रत्येक गरजू रुग्णापर्यंत पोहोचवण्यात या उपक्रमाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या कार्याची प्रेरणा फक्त आणि फक्त आमदार सुरेश धस यांच्या जनतेसाठी सदैव तत्पर या कार्यपद्धतीतून मिळाली असल्याचं ग्रुपचे कार्यकर्ते सांगतात. रुग्ण सेवक अमर वाळके म्हणाले,गेल्या वर्षभरात आमच्या ग्रुपने १०० रुग्णांना मदतीचा हात दिला आणि शासन योजनांमधून ८२ लाखांची थेट आर्थिक मदत मिळवून दिली. या सेवाभावी प्रवासात मला थोडं का होईना आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली योगदान देता आलं, ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. या उपक्रमामुळे आष्टी मतदारसंघात सामाजिक बांधिलकीची परंपरा अविरत चालू आहे.गरजू रुग्णांना नवसंजीवनी देण्याचं काम 'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' ग्रुप सातत्याने करत आहे.

## अटीट्यूट जर्नी चा पहिला उमरा जत्था मक्का-मदिना साठी रवाना

**बीड | प्रतिनिधी**
अटीट्युट जर्नी ता. आष्टी जिल्हा बीड महाराष्ट्र येथून भारत देशात व देशा बाहेरील एक डझन भर देशातून सुरु करण्यात आली असून टूर सर्व धार्मिक स्थळे मक्का-मदिना बरोबर इतर ऐतिहासिक व प्रेक्षनीय स्थळाची विझिट-दर्शन संपूर्ण माहितीसह प्रवाशांना विजा, विमान तिकीट, हॉटेल बुकिंग, बस-टेक्सी सेवा पुरवणे, देशी खाद्य सेवा उपलब्ध करून देते. सदर टूर सेवा बीड जिल्हातील नागरिका बरोबर महाराष्ट्रतील नागरिकांना माफक दारात एक विश्वनीय देणायचा प्रयत्न करत आहे. बीड जिल्हतील पाहिली टूर पथक माका-मदिना साठी मा.मिर्झा उबेद बेग संचालक व मा. मिर्झा शाहनवाज बेग मुख्य संचालक यांनी शेकडो च्या साक्षीने हिरवी झेंडी दाखून रवाना



केली. यावेळी मा. मिर्झा नियामत बेग मा. शिक्षण सभापती जिल्हा परिषद बीड, मा. अडो शेख शफिक भाऊ ए,आई,एम,आई एम बीड,हज कमेटी बीड चे संचालक काजीं नजीब,जिल्हा वक्फ ऑफिस शेख शोएब,शिक्षक नेते, रशीद खान, शेख मुसा,पेन्शनर संघटनेचे अध्येक्ष वजिर शेख, इंजिनिअर सय्यद मुजाहेद, शेख रशीद सर,व्यापारी-मजूर संघटनेचे शेख मुस्ताक, शेख कदीर उस्ताद, शेख राजू पटेल, सिकंदर पटेल,शेख मतीन,काजीं मुशाहेद,शेख मंजूर सर, पठाण नईम खान,अलीम मोमीन, मोहंमद इसहाक, मोमीन करीम,सिद्दीकी बशीर,सय्यद अवेजअली, शेख मुद्दशीर, शेख अय्याज, शेख रज्जाक यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. या वेळेस उपस्थित ग्राहक -प्रवाशांना टूर चे मुख्य संचालक मिर्झा शानवाज बेग यांनी एक विश्वासार्य सेवा देणाचा संकल्प केलाअसून टूर चे मुख्य कार्यालय बशीर गंज येथे सेवेसाठी सुरु केले आहे.

## सीसीआयची कापूस खरेदी १५ तारखेपासून सुरू होणार

**राज्यात असणार १५० कापूस खरेदी केंद्र**

**मुंबई | प्रतिनिधी**
सीसीआय'कडून देशभरात ५५० आणि महाराष्ट्रात १५० कापूस खरेदी केंद्रे सुरू करण्यात येत आहेत. दि. १५ ऑक्टोबरपासून ही केंद्रे महाराष्ट्रात सुरू होतील. मात्र, यंदापासून शेतकऱ्यांना खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी करावी लागणार आहे. तसेच लांबलेला पावसाळा व अतिवृष्टीमुळे कापूस ओला असल्याने 'सीसीआय'च्या १२ टक्क्यांपेक्षा कमी आर्द्रतेच्या निकषात शेतकऱ्यांचा कापूस बसेल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

खरीप कापूस हंगाम २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी देशभरातील ११ प्रमुख कापूस उत्पादक राज्यांमध्ये ५५० किमान आधारभूत किंमत खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. आतापर्यंतची » पान २ वर

## माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या पथनाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**माजलगाव | प्रतिनिधी**
युनोने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केले. त्यानंतरची दहा वर्षे महिला दशक म्हणून जाहीर झाले. यावर्षी (२०२५) या घटनेस ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदने महाराष्ट्रातील महिलांच्या परिस्थितीचा आढावा घेऊन अनेक उपक्रम हाती घेतले. त्यापैकी एक सार्वजनिक वाहन स्थानकांवर महिला किती सुरक्षित आहेत त्याचा लेखाजोखा. या अनुषंगाने संपूर्ण महाराष्ट्राभर एस टी बस स्थानके व रेल्वे स्थानकांचे सेफ्टी ऑडीट करण्यात आले. माजलगाव विकास प्रतिष्ठानने माजलगाव व तेलगाव या बस स्थानकांचे नुकतेच सेफ्टी ऑडीट केले. या ऑडिट दरम्यान मिळालेले अनुभव आणि निरीक्षणे यांच्या आधारे सुरक्षितता आणि मूलभूत हक्क या महत्त्वाच्या विषयावर आधारित पथनाट्याची निर्मिती करण्यात आली. या नाट्यप्रयोगाद्वारे सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न



आणि प्रत्येक नागरिकाचे मूलभूत हक्क यांविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नवरात्र महोत्सवात स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असतो. त्या निमित्ताने हे पथनाट्य वेगवेगळ्या ठिकाणी सादर करण्यात आले. यामागे सामाजिक जागृतीचा संदेश देण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता. सुरक्षितता ही केवळ शासकीय यंत्रणांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश या नाट्याद्वारे प्रभावीपणे मांडण्यात आला.या पथनाट्य सादरीकरणात सिंदफणा पब्लिक स्कूल चे सांस्कृतिक विभाग प्रमुख सखाराम जोशी यांच्यासह अनेक शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रवीण मडके, कृष्णा नवले, वरुणराज तौर, प्रवीण तिवारी, मलिक शेख,ज्योती जोशी, अर्चना जाधव, अश्विनी सोळंके या शिक्षकांनी आणि इयत्ता आठवीचा विद्यार्थी उसेद शेख तसेच मीना कदम या शिक्षकेतर कर्मचारी यांनी नाट्याला प्रभावी स्वरूप दिले. शिक्षकांच्या या सक्रिय सहभागामुळे सामाजिक जबाबदारीच्या संदेशाला अधिक वजन मिळाले. बस स्थानकासारख्या सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही ज्वलंत आहे. या पथनाट्याद्वारे सार्वजनिक ठिकाणांवरील मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि नागरिकांच्या हक्कांबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद आणि माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. भविष्यातही अशाच जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम फक्त कागदावरच,शासनाच्या कोट्यावधीच्या निधीची लूट - ॲड.इरफान बागवान

**बीड | प्रतिनिधी**
बीड जिल्ह्यात शासनाच्या अत्यंत चांगली व बालकासाठी वरदान ठरणारी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम ही योजना फक्त कागदावरच दिसून येत असून या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात ७० ते ८० लोकांच्या नियुक्त्या केलेल्या असून त्यात डॉक्टर फार्मासिस्ट स्टाफ नर्स व इतर लोकांच्या नेमणुका केलेल्या असून एन एच एम च्या अधिपत्याखाली सदरील योजनेसाठी कोट्यावधीचा निधी शासन खर्च करत असून यातील डॉक्टर व इतर कर्मचारी यांना भरपूर पेमेंट देण्यात येत आहे या सर्वांनी संगणमत करून फक्त कागदावरच ही योजना राबवित आहेत या योजनेत जिल्ह्यात वेगवेगळ्या टीम बनवून प्रत्येक अंगणवाडी अथवा बालवाडी येथे विजिट करून



भेट करणे बंधनकारक असून तेथील मुलांची तपासणी करून त्यांना काही असाध्य रोग किंवा आजार आहेत का याच्या विविध चाचण्या करणे गरजेचे असताना व विजीट करण्यासाठी प्रत्येक टीम करिता फिरण्यासाठी गाड्यांचे ही वेगळे टेंडर करण्यात आलेले असूनही सदरील नेमणूक केलेले डॉक्टर फार्मासिस्ट व इतर स्टाफ हे कोणतेही तपासणी न करता सदरील विजीटच्या ठिकाणी कधीतरी जाऊन तेथील अंगणवाडी अथवा बालवाडी च्या हजेरी रजिस्टर ची फोटो घेऊन त्यात उपलब्ध सर्व माहिती घेऊन सदरील योजना ही फक्त कागदोपत्री राबवीत आहेत तसेच ड्युटीला जिल्हा रुग्णालय परिसरात जाऊन फक्त अँप द्वारे हजेरी लावून परत आपल्या खाजगी दवाखान्यात प्रॅक्टिस करीत आहे.

वरील कार्यक्रमासाठी » पान २ वर

## सरन्यायाधीश यांच्यावर हल्ला करणाऱ्यावर गुन्हा दाखल करा



**पाटोदा | प्रतिनिधी**
सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश मा. भूषण गवई साहेब यांच्यावर न्यायालयात वकील राकेश किशोर तिवारी यांनी बूट फेकून हल्ला केला आहे. हा हल्ला भारताच्या संविधानावर आहे. ही घटना लोकशाहीची मूल्य पायदळी तुडवणारी आहे. भारत देशाच्या सरन्यायाधीशावर हा हल्ला करून न्यायालयाचा घोर अपमान केलेला आहे. राकेश किशोर यांचे कृत्य निषेधार्थ असून अशा माथेफिरू व्यक्तिवर रासुका कायद्यान्वये गुन्हा दाखल करून अटक करणे आवश्यक आहे.अशी पाटोदा संविधान प्रेमीनी केली आहे. लोक भावनेचा आदर करून भारत सरकारने राकेश किशोर यांच्यावर कडक कार्यवाही करावी अशी पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी श्रीमती शेख वसिमा मडम यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. या वेळी माजी मुख्याध्यापक एल.आर.जाधव, भाई विष्णुपंत घोलप, भगवानराव जावळे, गणेश कवडे, सय्यद सज्जाद, राहुल जाधव, मुकुंद शिंदे, हामिद पठाण, विठ्ठल नाईकवाडे (मामा) शेख इम्रान, राजेंद्र वारभवन, आदींच्या सह्या आहेत.

## महात्मा गांधींचा सत्य आणि अहिंसा मार्ग आजही प्रेरणादायी : प्रा.भागवत शेळके



**शिरूर का. | प्रतिनिधी**
राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सत्य आणि अहिंसा या विचारांची आजही समाजात अत्यंत मोठी प्रेरणा आहे. असे प्रतिपादन कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी प्रा. भागवत शेळके यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे हे होते.व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.संजय तुपे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी.टी पवार कर्मचारी सचिव डॉ.नवनाथ पवळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा.शेळके म्हणाले की,जागतिक स्तरावर बदलत्या परिस्थितीतही गांधीजींचे तत्त्वज्ञान मानवतेचा मार्ग दाखवते, असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे म्हणाले की.गांधीजींनी त्यांच्या आयुष्यभर सत्य म्हणजेच सत्याच्या शोधाला सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या मते, सत्याशिवाय कोणतीही गोष्ट टिकाऊ आणि शाश्वत होऊ शकत नाही.ते म्हणत असत सत्य हेच देव आहे.तसेच,अहिंसा हा त्यांचा जीवनमार्ग होता. गांधीजींनी मानले की हिंसेने फक्त द्वेष वाढतो, परंतु अहिंसेने शत्रूही मित्र बनू शकतो. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अहिंसेचा अवलंब करून जगाला शांततामय संघर्षाची नवी दिशा दिली. आजच्या काळात वाढतीअसहिष्णुता, सामाजिक तणाव आणि स्पर्धेच्या वातावरणात गांधीजींचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरत आहेत. शिक्षण संस्था, स्वयंसेवी संघटना आणि युवकांनी सत्य व अहिंसेचा संदेश आत्मसात करून समाजात सद्भावना निर्माण करावी, असा सल्ला शेवटी त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.



## मौलाना हाफिज नदीम सिद्दीकी यांची सहाव्यांदा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदी बिनविरोध निवड

**पात्रुड | प्रतिनिधी**
जमीयात उलेमाये हिंद (मौलाना महमूद मदनी गट) च्या महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष पदी हाफिज नदीम सिद्दीकी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांची सहाव्यांदा ही निवड आहे . त्यांचे निवडी बदल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. मौलाना हाफिज नदीम सिद्दीकी यांचे महाराष्ट्र मध्ये चांगले कार्य असल्याने त्यांची सहाव्यांदा महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांचे शब्दल मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे . त्यांचे या निवडी ने त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे . तसेच सायं दैनिक किसान च्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## शहरातील अंगणवाड्यात सावळा गोंधळ !

### बीड शहरातील अंगणवाडी तपासणी करावी-सोमेश्वर कदम

**बीड | प्रतिनिधी**
बीड शहरातील अनेक अंगणवाड्यांमध्ये गंभीर अनियमितता आढळून आल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. बालकांना दिला जाणारा खाऊ, पोषण आहार, तसेच गरोदर मातांना मिळणारा हक्काचा आहार हा प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत न पोहोचता साठवून ठेवला जात असून बालकांचा व गरोदर मातांच्या आहार कोणाच्या घशात ? असा सवाल मनसेचे सचिव सोमेश्वर कदम यांनी केला आहे.



अंगणवाडी तपासणी दरम्यान समजले की बालकांना नियमितपणे खाऊ दिला जात नाही. राज्यातील एकही बालक कुपोषित होऊ नये म्हणून राज्य सरकारकडून बालकांना शालेय पोषण आहार दिला जातो, प्रत्यक्षात मात्र हा आहार त्या बालकापर्यंत पोहोचत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.तसेच अंगणवाडीतील पटसंख्या दिसून येत नाही. तसेच अंगणवाड्याला वेळेचे बंधन देखील नसल्याची बाब समोर आली आहे. अनेक अंगणवाड्या ह्या वेळे आधीच बंदच असल्याची देखील माहिती मिळत आहे.

बालकांना दिला जाणाऱ्या आहारामध्ये चिक्की, राजगिरा लाडू,खिचडी तसेच इतर पौष्टिक खाऊचे साहित्य बालकांना वाटप न होता सेविकांकडून घरी नेले जात असल्याच्या तक्रारी पालकांनी केल्या » पान २ वर

**दैनिक बीड सुपरफास्ट** हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक **अतुल शंकरराव जाधव** यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स अॅण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ ( महाराष्ट्र राज्य) येथून छापून, **दैनिक बीड सुपरफास्ट** कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका : अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. **संपादक : अतुल शंकरराव जाधव**

Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE : NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN - 431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV